**पणन हंगाम २०२५-२०२६ मध्ये किमान आधारभुत किंमत योजनेंतर्गत खरेदी केलेल्या धानाच्या भरडाईअंती जमा होणारा तांदूळ (CMR) साठवणुकीसाठी गोदामे भाडेतत्वावर घेणेबाबत.**

## महाराष्ट्र शासन

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**

**शासन निर्णय क्रमांकः गोदाम- २०२६/प्र.क्र.१५०/नापु-२९**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२

**दिनांक: १७ एप्रिल २०२६**

वाचा :-

1. **शासन निर्णय क्रमांकः खरेदी २६२१/प्र.क्र.१८२/नापु-२९, दिनांक ४ नोहेंबर २०२५**
2. **शासन निर्णय क्रमांक: धानभ २६२३/ प्र.क्र. १८३/नापु २९, दिनांक २२ नोहेंबर २०२५**

प्रस्तावना :-

किमान आधारभुत किंमत योजना ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. सदर योजनेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेतंर्गत खरेदी करण्यात येणा-या धानाची भरडाई करून तयार होणारा व विहीत मानकांची प्रतिपुर्ती करणारा तांदूळ राज्य शासनाच्या गोदामात जमा करून लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत वितरीत करण्यात येतो. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये विशेषत: पूर्व विदर्भातील जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात धान खरेदी करण्यात येतो. प्रस्तुत धानाची केंद्र शासनाने विहीत केलेल्या कालावधीत भरडाई करणे आवश्यक असते. यानुषंगाने होणा-या भरडाईअंती जमा होणा-या तांदळाच्या साठवणुकीसाठी सदर जिल्ह्यांमध्ये अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडे पुरेशी यंत्रणा उपलब्ध नसल्यामुळे साठवणूक क्षमता उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अनुषंगाने गोदामे भाडे तत्वावर घेण्याची तसेच या गोदामांसाठी आवश्यक सुचना, गोदामभाड्यांची परिगणना करण्यासाठी एकसमान कार्यपद्धत ठरविणे यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सदर अनुषंगाने पुढीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

१. जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी संबंधित जिल्ह्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोदामांची क्षमतेनुसार संख्या निश्चित करावी व सदर गोदामामध्ये केंद्र/राज्य शासनाने धान/सीएमआर साठवणूकीकरिता विहित केलेल्या सर्व सोयी उपलब्ध असल्याबाबत प्रथमत: खातरजमा करावी.

२. गोदाम मालकाने सादर केलेली गोदामाची क्षमता ही प्रत्यक्षात तितकी असल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी जिल्हा पुरवठा अधिकारी याची असेल.

**३. <u>सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत वितरीत करावयाच्या अन्नधान्याच्या साठवणूकीच्या प्रायोजनार्थ गोदाम भाड्याने घेण्यात येत असल्याने या गोदामांना विभागाच्या गोदाम मॅन्युअलमधील सर्व तरतुदी भाड्याने घेतलेल्या कालावधीसाठी लागु असतील. याबाबत गोदाम मालक यांची कोणतीही तक्रार असणार नाही. सदर बाबी मान्य असल्याबाबत गोदाम मालकांकडुन हमीपत्र घेण्याची जबाबदारी जिल्हा पुरवठा अधिकारी यांची असेल.</u>**

**४. <u>गोदामाच्या एकुण क्षमतेपैकी शासनास प्रत्यक्ष आवश्यकता असेल इतकीच क्षमता भाड्याने घेण्याचा अधिकार शासनास असेल. सदर बाबी मान्य असल्याबाबत गोदाम मालकांकडुन हमीपत्र घेण्याची जबाबदारी जिल्हा पुरवठा अधिकारी यांची असेल. सदर बाब मान्य नसल्यास अशा प्रकरणी गोदाम भाड्याने घेण्याचे नाकारण्याचा सर्वस्वी अधिकार शासनाचा असेल.</u>**

**५.** गोदामे सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी गोदाम मालक यांची असेल. जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी याबाबत गोदाम धारक याच्यावर नियंत्रण ठेवावे.

**६.** शासनाने मंजुर केलेल्या गोदाम क्षमतेपैकी देखिल क्षेत्रिय स्तरावर प्रत्यक्ष आवश्यक असलेल्या क्षमतेचेच गोदाम भाड्याने घेण्याची जबाबदारी जिल्हा पुरवठा अधिकारी यांची असेल.

**७.** भाडेतत्वावर घेतलेल्या गोदामातील साठ्याचा विमा, किड प्रतिबंधात्मक उपाययोजना, आवश्यक डनेज, ताडपत्र्या, सुरक्षा, आवकजावकच्या नोंदी इत्यादीबाबत गोदाम मालक यांच्याकडून आवश्यक असणारी कामे करण्याच्या संदर्भात जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे नियंत्रण राहील.

८. भाडेतत्वावर घेतलेल्या गोदामात माल साठवणूक करण्यापुर्वी मालाची गुणवत्ता अन्न, नागरी पुरवठा विभागाने नियुक्त केलेल्या गुणवत्ता नियंत्रक (QC) यांचेकडून प्रमाणित करुन दिल्याचे (स्विकृती) प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर गोदामात तांदूळ स्विकारण्यात येईल.

९. गोदामात मुलभूत सुविधा जसे पिण्याचे पाणी, आवश्यक प्रकाश व्यवस्था, शौचालय इत्यादी पुरविण्याची जबाबदारी गोदाम मालकाची राहील. सुरक्षिततेच्या दृष्टीने गोदामात पुरेशे अग्निशामक यंत्र बसविण्याची जबाबदारी गोदाम मालक यांची असेल.

१०. अन्नधान्याचे वजन करून देण्यासाठी वे ब्रिज काटा गोदामात उपलब्ध करून देण्यात येईल. गोदामात वे ब्रिज काटा नसल्यास १ आठवड्याच्या आत वे ब्रिज काटा बसवून घेण्याची जबाबदारी जिल्हा पुरवठा अधिकारी यांची असेल.

११. गोदामातील कार्यालयीन कामकाजासाठी संगणक, प्रिंटर व इंटरनेट व्यवस्था उपलब्ध करून देण्याची जबाबदारी गोदामधारक यांची असेल.

१२. संपूर्ण गोदाम CCTV च्या निगराणीखाली असेल. गोदामाच्या आत प्रवेशद्वार तसेच संपूर्ण गोदाम कव्हर होईल अशापध्दतीने सी. सी. टी. व्ही. कॅमेरा गोदाम मालक यांच्यावतीने बसवून देण्यात येईल व सदर CCTV चित्रीकरणाचे दर १५ दिवसांचे फुटेज पेन ड्राईव्ह मध्ये कॉपी करून सदरहू पेनड्राईव्ह स्वतः किंवा गोदाम व्यवस्थापक यांचे मार्फत जिल्हा पुरवठा कार्यालयातील नियंत्रण कक्षास उपलब्ध करून देण्याची जवाबदारी गोदाम मालकाची राहील

**१३.धान भरडाईचे काम दि. ३१ जुलै २०२६ पर्यंत पूर्ण करावयाचे असल्यामुळे दि. ३१ जुलै २०२६ पर्यंत गोदाम रिकामे करून गोदाम मालकांना हस्तांतरीत करण्यात येईल. शासन स्तरावरून भरडाई प्रक्रियेसाठी मुदतवाढ दिल्यास मुदतवाढीच्या दिनांकापर्यंत गोदाम जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या ताब्यात राहील. तसेच काही अपरिहार्य कारणास्तव भरडाईची मुदत संपल्यानंतर सदर गोदामात जेवढा सीएमआर साठा शिल्लक राहील तेवढया सीएमआर साठवणुकीच्या क्षमतेकरीता सदर गोदाम वापरण्यात येईल व उर्वरीत गोदाम गोदाम मालकांना परत करण्यात येईल.**

**१४.धान भरडाई सुरु असलेल्या कालावधीत गोदाम भाडे मंजुर केलेल्या पुर्ण क्षमतेसाठी केंद्र शासनाने चालू पणन हंगाम २०२५-२६ साठीच्या तात्पुरत्या दर पत्रकामध्ये नमुद केलेल्या प्रति क्विंटल प्रति माह या दरानुसार अदा करण्यात येईल.**

**१५.मुदत संपलेल्या कालावधीचे भाडे हे गोदामातील उपयोगात आणलेल्या दैनंदिन साठयाच्या क्षमतेप्रमाणे देण्यात येईल .त्यासाठी पुढील सुत्राचा वापर करण्यात येईल.**

| | | | |
|---|---|---|---|
| | एक दिवस साठवणुकीत असलेल्या CMR चे परिमाण (क्विंटलमध्ये) | * | मंजुर गोदाम क्षमतेसाठी परिगणित होत असलेले मासिक भाडे रक्कम (रुपये) |
| एका दिवसाचे भाडे- | ---------------------------------------------------------- | | |
| | गोदामाची भाड्याने घेतलेली क्षमता (क्विंटलमध्ये) | * | महिन्याचे दिवस |

**एक दिवस साठवणुकीत असलेल्या CMR चे परिमाण (क्विंटलमध्ये) –**

दिवसाच्या अखेरीस गोदामामध्ये प्रत्यक्ष साठ्यास असलेल्या सिएमआरचे प्रमाण क्विंटलमध्ये.

उदा. दिवसाच्या सुरवातीला असलेला साठा (२०० क्विंटल)+दिवसामध्ये गोदामात आवक झालेला सिएमआर (३०० क्विंटल) = दिवसाच्या अखेरीस असलेला साठा. (२००+३००=५०० क्विंटल)

**मंजुर गोदाम क्षमतेसाठी परिगणित होत असलेले मासिक भाडे रक्कम-**

भाड्याने घेण्यात आलेल्या क्षमतेसाठी तात्पुरत्या दरपत्रकामध्ये नमुद करण्यात आलेल्या दरानुसार प्रति क्विंटल प्रति महिना या दरानुसार परिगणित होणारी रक्कम.

उदा. १००० क्विंटल क्षमतेस भाड्याने घेण्यास मंजुरी दिली असेल व तात्पुरत्या दर पत्रकामध्ये प्रति क्विंटल प्रति माह रु. ९.७२ दर मंजुर असल्यास परिगणित होत असलेली मासिक भाडे रक्कम १०००*९.७२ = ९७२० रुपये

**गोदामाची भाड्याने घेतलेली क्षमता -**

गोदामाच्या एकुण स्थापित क्षमतेपैकी शासनाने भाड्याने घेण्यासाठी मंजुर केलेली क्षमता.

उदा. गोदामाची एकुण क्षमता २००० क्विंटल असेल व त्यापैकी भाड्याने घेण्यास मंजुरी दिलेली क्षमता १००० क्विंटल असेल तर येथे १००० क्विंटल क्षमता गृहीत धरावी.

**महिन्याचे दिवस-**

ज्या महिन्यात गोदाम भाड्याने घेण्यात आले आहे त्या महिन्याचे दिवस.

उदा. नोहेंबरसाठी ३० दिवस, डिसेंबरसाठी ३१ दिवस.

उदा. एकुण २००० क्विंटल क्षमतेपैकी १००० क्विंटल क्षमता भाड्याने घेण्यास मंजुरी असलेल्या गोदामामध्ये माहे नोहेंबर महिन्यात एक दिवस साठवणूकीत असलेल्या १०० क्विंटल सिएमआरसाठी तात्पुरत्या दरपत्रकामध्ये नमुद करण्यात आलेल्या रु. ९.९२ या प्रति क्विंटल प्रति महिना दरानुसार एक दिवसाचे भाडे पुढीलप्रमाणे परिगणित करण्यात येईल.

- एक दिवस साठवणुकीत असलेल्या CMR चे परिमाण (क्विंटलमध्ये) - १०० क्विंटल
- मंजुर गोदाम क्षमतेसाठी परिगणित होत असलेले मासिक भाडे रक्कम - १०००*९.९२ = ९९२० रु.
- गोदामाची भाड्याने घेतलेली क्षमता - १००० क्विंटल
- महिन्याचे दिवस - ३०

$$= \frac{१०० * ९९२०}{१००० * ३०}$$

$$= \frac{९९२}{३०}$$

= ३३.०७ रुपये

१६.जिल्हा पुरवठा अधिकारी उपरोक्त सर्व अटिंचा समावेश करतील. त्याशिवाय अतिरिक्त अटिंचाही समावेश करारनाम्यात करतील.

१७.जिल्हा पुरवठा अधिकारी वरीलप्रमाणे देयके परिगणीत करुन सदर देयके वित्तीय सल्लागार व उपसचिव यांच्याकडे सादर करतील. वित्तीय सल्लागार व उप सचिव सदर देयके उप सचिव (किमान आधारभुत किंमत) यांच्यामार्फ़त शासनास सादर करतील.

१८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्र. २०२६०४१७१९३४४७२४०६ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAMOD ABAJI PATIL

Digitally signed by PRAMOD ABAJI PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FCSCPD, 2.5.4.20=4A3B99D57D257E955ED34CA51DB1F3C521002555E05C455E86FA1C9C82A1D82B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=68D5A8ABFFDD75CBA24301AA39C12B40983F304D7267796A32B42D4D558F1A1F, cn=PRAMOD ABAJI PATIL
Date: 2026.04.17 19:36:11 +05'30'

**( प्रमोद पाटील )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई
२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या,नाशिक
३) जिल्हाधिकारी, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली,
४) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा मुंबई.
५) उपआयुक्त (पुरवठा), सर्व विभाग.
६) जिल्हा पुरवठा अधिकारी,नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली,

**प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

१) मा.विरोधी पक्षनेता विधानसभा/विधान परिषद
२) सर्व विधान परिषद सदस्य व विधान सभा सदस्य.
३) अपर मुख्य सचिव, (पणन), सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५) प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (५ प्रती),
७) खाजगी सचिव, मा.मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण), मंत्रालय, मुंबई-३२.
८) मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची कार्यालये, (प्रत्येकी ५ प्रती),
९) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय ६ वा मजला, विधानभवन, मुंबई. (१० प्रती)
१०) संचालक, दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन, मुंबई
११) संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक